।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

ACADEMIC PLANNING & DEVELOPMENT SECTION

Phone : (02462) 229242 Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 229574 E-mail: apds.srtmun@gmail.com


**छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज आणि सावित्रीबाई फुले यांचे नावाने विद्यापीठात अध्यासन व संशोधन केंद्र सुरू करण्याबाबत**

# प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितास कळविण्यात येते की, दि. १४/०३/२०२० रोजी संपन्न झालेल्या मा. अधिसभा बैठकीतील प्रस्ताव क्र. ३३ बाबत 'छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज आणि सावित्रीबाई फुले यांचे नावे विद्यापीठात अध्ययन व संशोधन केंद्र सुरू करण्यासंदर्भात प्रचलित नियमावलीप्रमाणे मान्यता देण्यात आली. तसेच यासंदर्भात लागणारा निधी देण्याबाबत जनतेला, सेवाभावी संस्था व व्यक्तींना आवाहन करण्यात यावे' असे ठरले आहे.

करिता प्रस्तुत विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधितांना आवाहन करण्यात येते की, सोबत जोडलेले परिपत्रक (शैनिविवि/परिपत्रक/अध्यासन निर्मिती धोरण/२०१९–२०/२६२६ दि. ०२ जानेवारी २०२०) अन्वये प्रमाणे विद्यापीठ परिसरात विविध अध्यासन केंद्रे सुरू करण्यासाठीच्या प्रचलित अध्यासन निर्मितीचे धोरणानुसार छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज आणि सावित्रीबाई फुले यांचे नावे अध्यासन व संशोधन केंद्राचे प्रस्ताव दाखल करावेत.

सदरील परिपत्रक व अध्यासन निर्मिती धोरण प्रस्तुत विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निर्देशनास आणुन द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.

कुलसचिव

**जा.क्र.:**शैनिविवि/परिपत्रक/अध्या.व संशोधन केंद्र/२०२०–२१/131

**दिनांक** : २९ जून २०२०.

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :

१. मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा. संचालक, स्वारातीम विद्यापीठ उपकेंद्र, औसा रोड पेठ, लातूर.
५. मा. प्र. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.
६. मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
७. मा.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
८. मा. समन्वयक, श्री गुरू गोविंदसिंघजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.
९. मा. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.
१०. सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे.

।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
ACADEMIC PLANNING & DEVELOPMENT SECTION
Phone : (02462) 229242
Fax : (02462) 229574
Website: srtmun.ac.in
E-mail: apds.srtmun@gmail.com

**विद्यापीठ परिसरात विविध अध्यासन केंद्रे सुरू करण्यासाठी अध्यासन निर्मितीच्या धोरणाबाबत**

## प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितास कळविण्यात येते की, दि. ०४/१२/२०१९ व विस्तारीत दि. १७.१२.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ६३ व्या मा. व्यवस्थापन परिषद बैठकीतील विषय क्र. ११/६३–२०१९ च्या ठरावानुसार सोबत जोडल्याप्रमाणे विद्यापीठ परिसरात विविध अध्यासन केंद्रे सुरू करण्यासाठी अध्यासन निर्मितीचे धोरण लागु करण्यात आले आहे.

सदरील परिपत्रक व अध्यासन निर्मिती धोरण प्रस्तुत विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निर्देशनास आणुन द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:**शैनिविवि/परिपत्रक/अध्यासन निर्मिती धोरण/२०१९–२०/2626
**दिनांक** : ०२ जानेवारी २०२०.

कुलसचिव

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :
१. मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा. संचालक, स्वारातीम विद्यापीठ उपकेंद्र, औसा रोड पेठ, लातूर.
५. मा. प्र. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.
६. मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
७. मा.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
८. मा. समन्वयक, श्री गुरू गोविंदसिंघजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.
९. मा. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.
१०. सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी नांदेड.

## अध्यासन निर्मिती धोरण

१. मा. व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेले आणि मा. कुलगुरूंच्या मान्यतेने विद्यापीठ परिसरात कोणतेही अध्यासन सुरू करता येईल.

**२. संचालक मंडळ खालीलप्रमाणे असेल.**

| | |
|---|---|
| १. अध्यक्ष | — मा. कुलगुरू |
| २. उपाध्यक्ष | — मा. प्र—कुलगुरू |
| ३. सदस्य | — मा. कुलसचिव |
| ४. सदस्य | — पुर्वी मा. संचालक मविविमं होते यांच्याऐवजी दुसरे नामनिर्देशन |
| ५. सदस्य | — मा. वित्त व लेखाधिकारी |
| ६. मा. कुलगुरू नियुक्त : | |
| | १. — मानद सदस्य (संबंधित अभ्यास क्षेत्रातील अभ्यासक) |
| | २. —मानद सदस्य (विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य) |
| | ३. —मानद सदस्य (मा. व्यवस्थापन परिषद सदस्य) |
| | ४. —मानद सदस्य (विद्यार्थी परिषद अध्यक्ष— पदसिध्द) |
| | ५. —मानद सदस्य (सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती) |
| | ६. —मानद सदस्य (विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक) |
| | ७. —मानद सदस्य (————————————————————) |
| १३. अध्यासनाचे संचालक | — पदसिध्द सचिव |

### ३. संचालकाचे कार्य :

१. अध्यासनाचे संचालक नियुक्त केल्यानंतर संबंधित संचालकांनी अध्यासनाच्या कार्याचा कालबध्द कार्यक्रम तयार करून वर्षभरातील कार्यक्रमाचे नियोजन करून सल्लागार समितीकडून मान्य करून घेणे.

२. संचालकानी अध्यासन केंद्राच्या लौकीकाला बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी.

३. अभ्यासवृत्ती जोपासण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे.

४. अध्यासनाकडून समाजाच्या अपेक्षा आणि गरजा पूर्ण करण्यासाठी उच्च प्रतीचे संशोधन करण्यात यावे.

५. अध्यासनाच्या निगडीत ज्ञानक्षेत्राशी संबंधित कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या कक्षेबाहेरील संशोधन संस्थाशी शासकीय/अशासकीय संस्थाशी संचालकाचा संपर्क असावा. त्याच्यांशी वैचारिक व अन्य प्रकारची देवाणघेवाण व्हावी या दृष्टीने प्रयत्न करावेत.

६. अध्यासनाशी संबंधित संशोधनास प्रोत्साहन देणे, संशोधन आणि इतर लेख प्रकाशित करणे.

७. अध्यासनाशी संबंधित काही दुर्मिळ वा मौलिक कागदपत्रे/दस्ताऐवज/साहित्य इत्यादीचे संकलन करून जतन करणे.

८. अध्यासनाच्या कार्याविषयीची माहितीपुस्तिका तयार करून विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

९. अध्यासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणे संचालकास अनिवार्य आहे.

४. **प्रत्येक अध्यासनाचे एक सल्लागार मंडळ गठित करावे. सल्लागार मंडळ खालील प्रमाणे असावे.**

अ) अध्यक्ष — मा. कुलगुरू

ब) उपाध्यक्ष — मा. प्र—कुलगुरू

क) सदस्य — मा. वित्त लेखाधिकारी

ड) मा. कुलगुरू नामनिर्देशित/नियुक्त चार सदस्य

१. ——————————

२. ——————————

३. ——————————

४. ———————————

फ) सदस्य — अध्यासन देगणीदार

ज) सदस्य सचिव — अध्यासन संचालक/समन्वयक

५. **सल्लागार समितीचे कार्य व अधिकार :**

अ. वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन/नियोजन अध्यासन संचालकाशी चर्चा करून ठरवावे.

ब. वार्षिक अंदाजपत्रक तयार करून मान्यतेस्तव सादर करावे.

क. अध्यासन सक्षम चालविण्यासाठी नियम, धोरण तयार करणे व त्यात आवश्यतेनुसार बदल करणे.

ड. संचालकांनी आर्थिक गैरव्यवहार अथवा कोणत्याही स्वरूपाचा अनैतिक व्यवहार केल्याचे सिध्द झाल्यास संचालकावर कारवाई करण्याची शिफारस सल्लागार समिती करेल.

इ. सल्लागार समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका घेण्यात याव्यात सदर बैठका साधारणपणे जून/जुलै आणि ऑक्टोबर/नोव्हेंबर महिन्यात घेण्यात याव्यात. अतिरिक्त बैठका बोलावण्याचा अधिकार मा. कुलगुरूंना असेल.

फ. सल्लागार मंडळाने त्या त्या अध्यासनाची उद्दिष्टे व कृती कार्यक्रमाचा किमान पंचवार्षिक आराखडा तयार करावा.

६. अध्यासन संचालक म्हणून विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राचार्य/प्राध्यापक साहित्यीक/विचारवंत किंवा समाजप्रबोधनातील अभ्यासक कार्यकर्ता यांची निवड करता येईल.

७. संचालकाची नियुक्ती मा. कुलगुरूंकडून करण्यात यावी.

८. संचालकास प्रती माह मानधन व इतर आर्थिक बाबी संदर्भात मा. व्यवस्थापन परिषदेची वेळोवेळी स्वतंत्र मान्यता घेण्यात यावी.

९. संचालकाचा कार्यकाळ तीन वर्षाचा असेल.

१०. संचालकास अध्यासनाच्या कामासाठी विद्यापीठ नियमानुसार प्रवास भत्ता/दैनिक भत्ता देय राहील.

११. नवीन अध्यासन केंद्र सुरू करावयाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे/युजीसीकडे पाठविण्यात यावा. शासनाने/युजीसीने सदर अध्यासन केंद्र निधी किमान रू. २५,००,०००/— (रूपये पंचवीस लाख फक्त) उपलब्ध करून दिला तर सदरचे अध्यासन केंद्र सुरू करावेत. जर निधी २५,००,०००/— (रूपये पंचवीस लाख फक्त) पेक्षा कमी असेल तर उर्वरित निधी संबंधिताने विद्यापीठाकडे जमा करावा.

१२. अध्यासन स्थापनेसाठी निवेदनकर्त्याने कमीत कमी रू. २५,००,०००/— (रूपये पंचवीस लाख फक्त) देणगी द्यावी. तथापि ज्या व्यक्तीच्या नांवे अध्यासन सुरू करण्याची मागणी केलेली आहे त्या व्यक्तीचे

राष्ट्रीय/सामाजिक कार्य लक्षात घेवून अध्यासन केंद्र सुरू करावे. सदर रक्कम विद्यापीठाने कायम ठेव म्हणून ठेवावी. या रकमेच्या व्याजातून सदर अध्यासनाचे व्यवहार व कार्यक्रम करावेत.

१३. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या अध्यासनास मा. व्यवस्थापन परिषदेची वेळोवेळी मान्यता घेऊन आर्थिक तरतूद करण्यात येईल.

१४. संचालकाने स्वत:च्या अध्यासनाच्या कार्यक्रमाचा व खर्चाचा वार्षिक अहवाल विद्यापीठास ३१ मार्च पूर्वी सादर करावा.

१५. अध्यासन संचालकाने अध्यासनासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, केंद व राज्य शासन, विविध विश्वस्त संस्था, उद्योगसमूह, दानशूर व्यक्ती यांच्याकडे आर्थिक मदतीसाठी वेळोवेळी प्रस्ताव तयार करून पाठवावेत. तसेच लोक प्रतिनिधी यांच्याशी संपर्क करून इमारत/ग्रंथालय ईतर कार्यासाठी देणगी मिळविण्याचा प्रयत्न करावा.

१६. अध्यासनाच्या स्थायी निधीतून येणाऱ्या व्याजाच्या ऐंशी टक्के (80%) रक्कम प्रतीवर्षी अध्यासनासाठी खर्च करावी आणि उर्वरित वीस टक्के (20%) रक्कम प्रतीवर्षी अध्यासनाच्या स्थायी निधीत जमा करावी.

१७. विद्यापीठातील विविध संकुलामध्ये/विभागामध्ये विषयानुरूप अध्यासने जोडली जावीत.

१८. अध्यासनासाठी संकुलामध्ये संचालकासाठी एक व कार्यालयीन कामकाजासाठी एक अशा किमान दोन खोल्यांची फर्निचरसह तरतूद करण्यात यावी. शक्य असल्यास ग्रंथालयासाठी किमान एक दालन असावे.

१९. अध्यासनासाठी गरजेनुसार पुर्ण वेळ/अर्धवेळ/अभ्यागत मार्गदर्शक **(Visiting Faculty)** शिक्षकांची सोय करण्यात यावी.

२०. अध्यासनाच्यावतीने विविध अभ्यासक्रमाची सोय करण्यात यावी.

********